# हवामान आधारित कृषि सल्ला
## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र,
## कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

**दूरध्वनी –(०२१८९) २३३००१** **ईमेल**-damu.kvkmohol@gmail.com

### (३९६) हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दिनांक १६/०४/२०२४

| मागील आठवडयातील हवामान (दि १०.०४.२०२४ ते १६.०४.२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (दि.१७.०४.२०२४ ते २१.०४.२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | दिनांक | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| ०.० | ०.० | ६.० | -- | ३.२ | ०.० | -- | पाऊस (मि. मी.) | ४.० | ६.० | ३.० | ०.० | १.० |
| ४०.२ | ४०.० | ३९.४ | -- | ३७.७ | ३८.६ | -- | कमाल तापमान (अं. से.) | ४१ | ४२ | ४१ | ४१ | ४२ |
| २७.१ | -- | २३.४ | -- | २३.६ | -- | -- | किमान तापमान (अं. से.) | २८ | २८ | २९ | २८ | २७ |
| निरभ्र | -- | निरभ्र | -- | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | -- | ढग स्थिति (आकाश ) | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ |
| ८६ | ६० | ९५ | -- | ९४ | | -- | सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ४१ | ४६ | ४२ | ३५ | ३८ |
| ६० | -- | ८० | -- | -- | ३५ | -- | दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ३१ | ३४ | ३५ | ३४ | ३५ |
| ३.७ | ३.७ | ३.७ | -- | ३.७ | ३.७ | -- | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १५ | १६ | १७ | १९ | २१ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | **भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र,मुंबई यांचे कडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सोलापूर जिल्ह्यामध्ये दिनांक १६ एप्रिल ते २१ एप्रिल, २०२४ दरम्यान आकाश अंशतः ढगाळ राहील. दिनांक १६ एप्रिल ते २१ एप्रिल दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.**<br><br>कमाल तापमान ४१ अंश सेल्सिअस ते ४२ अंश सेल्सिअस पर्यंत तर किमान तापमान २७ ते २९ अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ३५ ते ४६% तर दुपारची सापेक्ष आद्रता ३१ ते ३५ % दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी १५.० किमी ते २१.० किमी पर्यन्त राहण्याची शक्यता आहे.<br>**ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार सोलापूर जिल्ह्यात दिनांक १६ एप्रिल ते २१ एप्रिल २०२४ दरम्यान उष्ण रात्रीची स्थिती आणि तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजासह वादळी वारा (३० ते ४० कि.मी./तास), हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.** |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर)<br>**दिनांक २१ एप्रिल, २०२४ ते २७ एप्रिल, २०२४ दरम्यान**<br>पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे.<br>कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ तुरळक ठिकाणी वादळीवारा (वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० किमी), मेघगर्जना विजांसह, , हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेली रब्बी पिकाची काढणी करून घ्यावी काढणी झालेल्या पिकांची मळणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी मळणी करणे शक्य नसल्यास काढलेली पिके पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरित्या तडपत्रीने झाकून ठेवावीत तसेच पाऊसा पासून बचावासाठी उघड्यावरील धान्य सुरक्षित स्थळी हलवावे.<br>➢ उष्ण रात्रीची स्थिती पुढील तीन दिवस कायम राहू शकते त्यामुळे शेतकऱ्यांना त्यानुसार खबरदारीच्या उपाययोजना करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.<br>➢ उभ्या पिकांना हलके आणि वारंवार पाणी द्या, वाढीच्या टप्प्यावर सिंचनाची वारंवारता वाढवा, फक्त संध्याकाळी किंवा पहाटे पाणी द्या आणि शक्य असल्यास तुषार सिंचन वापरा.<br>➢ जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी तसेच जमिनीचे तापमान राखण्यासाठी पिकांचे अवशेष, पेंढा/पॉलीथीनने मल्चिंग करावे.<br>➢ पावसाचा अंदाज बघून पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी. |

# हवामान आधारित कृषि सल्ला
## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र,
## कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

**दूरध्वनी** –(०२१८९) २३३००१ **ईमेल**-damu.kvkmohol@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | ➢ काढणीस आलेल्या पक्व रब्बी पिकांची काढणी शक्यतो सकाळच्या वेळेस करावी. काढणी केलेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी.<br>➢ हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला व हवामानाच्या पूर्वानुमानाकरिता मेघदूत या मोबाइलअॅपचा वापर करावा. विजेच्या अंदाजाच्या पूर्वानुमाना करिता दामिनी मोबाइलअॅपचा वापर करावा.<br>❖ **शेतकरी बांधवांनी मेघ गर्जना , वीजांचा कडकडाट आणि होण्याची शक्यता असल्याने पुढील प्रमाणे काळजी घ्यावी.**<br>➢ मेघ गर्जना व वीजांचा कडकडाट वादळीवारा ची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागांना तसेच भाजीपाला पिकांना जोरदार वाऱ्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागांना तसेच भाजीपाला पिकांना जोरदार वाऱ्यामुळे झाडे पडू नये म्हणून काठी/ बांबू च्या सहहयाने आधार द्यावा.<br>➢ शेती मध्ये काम करत असल्यास त्वरित सुरक्षित ठिकाणी जावे. झाडाखाली थांबणे टाळावे.<br>➢ जनावरे तलाव नदी किंवा इतर पाण्याच्या ठिकाणी असतील तर त्वरित बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी ठेवावे.<br>➢ जनावरे ट्रॅक्टर किंवा इतर धातूंच्या वस्तूंपासून लांब बांधावीत.<br>➢ काढणी केलेला शेती माल प्लास्टीक च्या शिटणे झाकावा.<br>➢ विद्युत उपकरणे, विद्युत तारा यांचा संपर्क टाळावा.<br>➢ जनावरांना झाडाखाली जमा होऊ देऊ नये. |
| **संदेश** | | तुरळक ठिकाणी वादळीवारा (वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० किमी), मेघगर्जना विजांसह , हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने उशिरा लागवड केलेल्या पक्व झालेली रब्बी पिकांची - ज्वारी, गहू , हरभरा, मका इत्यादींची काढणी करुन घ्यावी. |
| **ऊस** | | सुरू ऊस:<br>खोड किडीमुळे शेंडे वाळत असतील, तर क्लोरॲन्ट्रानिलीप्रोल (०.४ जीआर) ७.५ किलो किंवा फिप्रोनील (०.३जीआर) १० ते १२ किलो प्रति एकरी वापरावे. अन्यथा क्लोरपायरीफॉस (२० ईसी) २ मि.लि. प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. एप्रिल महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ८.७३ प्रति दिवस एवढा असतो ऊस पिकास दररोज ७.२१ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ०१ तास ४८ मिनिटे चालवावा. |
| **उन्हाळी भुईमूग** | **शेंगा पोसण्याची अवस्था** | भुईमुग पिकास शेंगा पोसण्याच्या अवस्थेत (६५ ते ७० दिवस) पाण्याचा ताण पडू देऊ नये. या अवस्थेत संरक्षित पाण्याची पाळी द्यावी.<br>भुईमुग पिकात काही ठिकाणी पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे दिसून येत आहे. नियंत्रणासाठी पिकावर क्लोरोपायरीफॉस २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून निरभ्र वातावरणात फवारणी करावी. |
| **भाजीपाला** | **काढणी/ वाढीची अवस्था** | काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकांचे तसेच टरबूज, खरबूज इत्यादी पिकांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवण करावी. तुरळक ठिकाणी झालेल्या वादळी वारा, पाऊस, यामुळे नुकसान झालेल्या भाजीपाला पिके टरबूज, खरबुज गोळा करून नष्ट करावीत. तुरळक ठिकाणी झालेला पाऊस व ढगाळ वातावरणामुळे भाजीपाला पिकात रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून कार्बेन्डाझिम ३० ग्रॅम प्रति दहा लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावे |
| **कांदा** | **काढणी अवस्था** | पावसाची शक्यता असल्याने परिपक्व झालेला कांदा त्वरित काढणी करून घ्यावा. तसेच कापणी केलेली पिके शेडमध्ये ठेवावीत किंवा प्लॅस्टिक च्या कागदाने झाकून ठेवावीत. |
| **केळी** | | तुरळक ठिकाणी मेघ गर्जना, विजांचा कडकडाट सोसाट्याच्या वाऱ्यासह (वार्याचा वेग ताशी ३० ते ४० किमी) हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने केळी बागेतील वजनाने मोठ्या असलेल्या घडांची झाडे पडु शकतात. केळी बागेतील झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूचे किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पट्यांच्या सहयाने झाडांना / घडाना आधार/ टेकू द्यावा. शक्य असल्यास हेल नेट चा वापर करावा. |
| **द्राक्ष** | **पक्वता ते काढणी अवस्था** | तुरळक ठिकाणी वादळीवारा (वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० किमी) मेघगर्जना विजांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या द्राक्ष घडांची त्वरित काढणी करावी व सुरक्षित ठिकाणी ठेवावे तुरळक ठिकाणी झालेल्या वादळी वारा, पाऊस, यामूळे द्राक्षबागेत पडलेली फळे गोळा करून नष्ट करावीत. |
| **डाळिंब** | | सध्याची पावसाची स्थिती डाळिंब बागेत तेलकट डाग रोगाचा प्रादुर्भाव वाढण्यास अनुकूल आहे. तेलकट डाग रोगाच्या व्यवस्थापनासाठी ब्रोनोपॉल (९५ – ९८%) ०.५ ग्रॅम प्रती लिटर पाणी + कॉपर ऑक्सीक्लोराईड २ ते २.५ |

**दूरध्वनी –(०२१८९) २३३००१** **ईमेल**-damu.kvkmohol@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | ग्रॅम प्रती लिटर पाणी + स्प्रेडर स्टिकर ०.५ मिली प्रती लिटर पाणी याप्रमाणात पाऊस पडल्यानंतर फवारणी करा. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | तुरळक ठिकाणी मेघ गर्जना, विजांचा कडकडाट सोसाट्याच्या वाऱ्यासह, (वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० किमी) हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने जनावरे शक्यतो बाहेर चारावयास नेऊ नयेत. जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>➢ म्हशींना घर्मग्रंथी खूप कमी असल्याने व त्यांची त्वचा काळी असल्याने वाढणाऱ्या तापमानाचा गार्यपिक्षा म्हशींना त्रास जास्त होतो म्हणून म्हशींना पाण्यात हुंवन्यास सोडावे.<br>➢ जनावरे सावलीच्या ठिकाणी बांधावीत. शक्य असल्यास दिवसातून ४ ते ५ वेळा त्याच्या अंगावर पाणी फवारावे.<br>जनावरांना पुरेशे, शुद्ध व थंड पाणी पिण्यास द्यावे. जनावरांना पुरेसा प्रथिनेयुक्त व हिरवा चारा आणि खनिजमिश्रण द्यावे. |

**स्त्रोत :**
**१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान :विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर.**

**ठिकाण :कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.**
**दिनांक : १६ एप्रिल २०२४**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.**